So to fight against covid-19 it is necessary to know about covid-19. It is necessary to know about Covid-19 and accurate science communication. It is the purpose of this paper.

Keywords: Covid-19, Accurate Science communication

Introduction:

Corona Viruses are a family of viruses that can cause illnesses such as the common cold, severe acute respiratory syndrome (SARS) and middle east respiratory syndrome(MERS) in 2019, a new corona virus was identified as the cause of a disease outbreak that originated in China. In March 2020, the world Health organization (WHO) declared the Covid-19 out break a Pendamic.

To fight against Covid-19 it is necessary to know about coivd-19 symptoms, prevention, effect of this disease. Some people may have only a few symptoms and some people may have no symptoms at all. So every people have to contact our doctor or clinic right away for medical advice. For that we have to aware about covid-19 and accurate science knowledge about symptoms and prevention ways of Covid-19. That is the purpose of this paper.

Objects of the paper:

The objectives of the paper are as follows:

1. To study about the covid-19 pendamic.
2. To study the risk factor, symptoms and prevention ways of covid-19.
3. To study accurate science communication about Covid-19.

Discussion:

Covid-19 starts in December 19 at China. Now it spread more than 213 countries. In every Country so many people are affected and more than thousands are died. In every country every person have fear about covid-19. America, France, India, Russia, Briton and so many developed countries are also restless by Covid-19. No one can invent the medicine or vaccine of covid-19. All are trying at their best level.

Risk Factor, Symptoms of Covid 19:

Emergency signs and symptoms areas are as follows.

1. Trouble breathing
2. Persistent chest pain or pressure.
3. Inability to stay awake

4. New Confusion
5. Blue lips or face
6. Fever
7. Coughing
8. Trouble in throat
9. Weakness.
10. Sore throat
11. Running nose.

The virus appears to spread easily among people, and more continues to be discovered over time about how it spreads data has shown that it spreads from person to person among those in close contact (within about 6 feet, or 2 meters) The virus spreads by respiratory droplets released when some one with the virus cough, sneezes or talks. These droplets can be inhaled or land in the mouth or nose of a person nearby.

It can also spread if a person touches a surface with the virus on it and then touches his or her mouth, nose or eyes, although this isn't considered to be a main way it spreads.

Risk Factors:

Risk factors for Covid-19 appear to include:

- Recent travel from or residence in an area with ongoing community spread of covid-19 as determined by CDC or WHO.
- Close contact with someone (6 feet or 2 meters) who has covid-19 for more than 5 minutes or being coughed or sneezed on by an infected person.

Because of covid-19 complications can include as follows:

1. pneumonia and trouble breathing
2. Organ failure in several organs.
3. Heart problems.
4. A severe lung condition that causes a low amount of oxygen to go through your blood stream to your organs(acute respiratory distress syndrome)
5. Blood clots
6. Acute kidney injury
7. Additional viral and bacterial infections.

Prevention ways:

Although there is no vaccine available to prevent covid-19, you can take steps to reduce your risk of infection. Who and CDC recommended following these precautions for avoiding Covid-19.

1. Avoid large events and mass gatherings.
2. Avoid close contact (within about 6 feet) with anyone who is sick or has symptoms.
3. Stay home as much possible and keep distance between yourself and others. Keep in mind some people may have covid-19 and spread it to others even if they don't have symptoms or don't know they have covid-19.
4. Wash your hands often with soap and water for at least 20 seconds, or use an alcohol based hand sanitizer that contains at least 60 % alcohol.

5. Cover your face with a cloth face mask in public spaces, such as the grocery store, where it is difficult to avoid close contact with others, especially if you are in area with ongoing community spread. Only use nonmedical cloth mask, surgical masks and N-95 respirators should be reserved for health care providers.
6. Cover you mouth and nose with your elbow or a tissue when you cough or sneeze. Throw away the used tissue. Wash your hands right way.
7. Avoid touching your eyes, nose and mouth.
8. Avoid sharing dishes, glasses, towels, bedding and other house hold items if you are sick.
9. Clean and disinfect high-touch surfaces, such as doorknobs, light switches, electronics and counters, daily.
10. Stay home from work, school and public areas if you are sick. Unless you are going to get medical care. Avoid public transportation, taxis and ride-sharing if you are sick.
11. If you have a chronic medical condition and may have a higher risk of serious illness, check with your doctor about other ways to protect yourself.

Accurate Science communication about Covid- 19:

We have knowledge about science behind Covid-19.

Each and every person have to know	Importance of Cleanliness
	Virus creates in dirty places.
	Covid-19 Test result
	Procedure of Covid-19 spreadness
	Causes of Covid-19
	Precaution for Covid-19
	Remedies on covid-19
	Effect of Covid-19.

If your Covid-19 test is Positive then:

If your Covid-19 test is Positive then	1) Stay home
	2) Get rest and stay hydrated
	3) Stay in touch with your doctor
	4) Separate yourself from other people.

If your Covid-19 test is Negative then:

If your Covid-19 test is negative then	1) You probably were not infected at the time your sample was collected.
	2) However, that does not mean that you will not get risk.
	3) It is possible that you were very early in your infection when your sample was collected and that you could test positive later.
	4) A negative test result does not mean you won't get sick later

Conclusion:

From above discussion conclusions are as follows:

1. Prevention is better than cure.
2. For every ones healthy body we aware about symptoms, precautions, medicine of Covid-19 pendamic.
3. We have to know science behind Covid-19 and aware about it.

Recommendations:

1. People have to be Patience.
2. Follow rules of Government
3. Continuous aware about your health and have quick medicine for your sickness.
4. Be aware about social distance.
5. Stay home stay safe

References:

1. www.who.int.docs... Retrieved on 2nd June 2020
2. www.postermywall.com Retrieved on 2nd June 2020
3. www.mayoclinic.org Retrieved on 2nd June 2020
4. www.hse.ie.eng.news. Retrieved on 3rd June 2020
5. www.cdc.gov.communication Retrieved on 4th June 2020
6. www.shutterstock.com prevention covid19.in.

COVID – 19: Impact and Response

ISBN: 978-93-88901-11-6








Published By:
Bhumi Publishing, India

Book Code : EDU 423
Subject Code : EDU 423

52



लिंग, शाळा आणि समाज

EDU 423

अधिष्ठान अभ्यासक्रम

I/C. Principal
Acharya Jawadekar College of Education,
Gargoti, Dist. Kolhapur.

ज्ञानगंगा घरोघरी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

लिंग, शाळा आणि समाज

लेखक : प्रा. युवराज पवार, डॉ. नवनाथ इंदलकर, डॉ. संजय निंबाळकर, श्री. सचिन पोरे, श्रीमती ज्योती लष्करी, डॉ. विजया पाटील, डॉ. सोनुने एस. एस., डॉ. कविता साळुंके, डॉ. संगिता बिहाडे, डॉ. निलिमा मोरे, डॉ. विजया दहिवेलकर, डॉ. प्रतिभा देसाई

घटक १ : लिंग समभाव व प्रश्नांवरील उपाय १

घटक २ : लिंग आणि शालेय शिक्षण २९

घटक ३ : समाजविकासात शिक्षकाची भूमिका ७६

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. ई. वायूनंदन

संचालक : डॉ. कविता साळुंके (I/C)

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद सदस्य

डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य डॉ. आर. बी. मानेकर
शासकीय अध्यापक महाविद्यालय
अकोल

डॉ. हेमंत राजगुरू
सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. विजयकुमार पाईकराव
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य विजय जवळेकर
अध्यापक महाविद्यालय
मुंबई

प्राचार्य चंद्रकांत बोरसे
अध्यापक महाविद्यालय
नाशिक

प्राचार्य उर्मिला धूत
शासकीय अध्यापक महाविद्यालय
परभणी

डॉ. सुरेश पाटील
प्र. संचालक, मूल्यमापन विभाग
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. डी. डी. पवार
सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. जयदीप निकम
प्र. संचालक, आरोग्य विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. विजया पाटील
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

श्री. एस. व्ही. चौधरी
माजी संचालक, इग्नो
दिल्ली

प्रा. माधव पळशीकर
सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. संजीवनी महाले
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. एस. एस. सोनुने
सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

तज्ज्ञ सल्लागार समिती

डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

माजी प्राचार्य डॉ. शांताराम बुटे
अकोला

डॉ. नीलिमा सप्रे
सेवानिवृत्त प्राध्यापक, कोल्हापूर

प्राचार्य चंद्रकांत बोरसे
नाशिक

डॉ. चित्रा सोहनी
सेवानिवृत्त प्राध्यापक, पुणे

प्राचार्य वनिता काळे
अकोला

डॉ. संजीवनी महाले
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. पी. आर. गायकवाड
औरंगाबाद

डॉ. मीना कुटे
मुंबई

डॉ. गजानन गुल्हाणे
शिक्षणशास्त्र विभाग, अमरावती

डॉ. ह. ना. जगताप
सोलापूर

डॉ. संजीव सोनवणे
शिक्षणशास्त्र विभाग, पुणे

डॉ. वैजयंता पाटील
शिक्षणशास्त्र विभाग, नांदेड

डॉ. सुनीता मगरे
मुंबई

डॉ. अनंत जोशी
माजी संचालक, नाशिक

डॉ. ए. आर. राणे
जळगाव

डॉ. रेखा टोपकर
सांगली

डॉ. पद्मिनी एम.
शिक्षणशास्त्र विभाग, कोल्हापूर

पाठ्यक्रम विकसन समिती

डॉ. कविता साळुंके
नाशिक

डॉ. सी. डी. महाले
अकोला

डॉ. नलिनी पाटील
पुणे

डॉ. विजया दहिवेलकर
धुळे

डॉ. संध्या सामुद्रे
अकोला

प्रा. विजयकुमार पाईकराव
नाशिक

श्रीमती ज्योती आर. लष्करी
नाशिक

डॉ. संजीवनी महाले
नाशिक

डॉ. के. एम. चव्हाण
नाशिक

डॉ. पी. एस. देसाई
गारगोटी

प्रा. अंजली ठाकूर
अमरावती

डॉ. निलिमा अरविंद मोरे
मुंबई

डॉ. एस. एस. सोनुने
नाशिक

डॉ. रेखा टोपकर
सांगली

डॉ. कुसुम चौधरी
मुंबई

डॉ. ए. जी. वातकर
अकोला

डॉ. विजया पाटील
नाशिक

डॉ. डी. डी. पवार
नाशिक

श्री. सचिन अशोक पोरे
नाशिक

लेखन समिती

प्रा. युवराज पवार
सांगली

डॉ. नवनाथ इंदलकर
सांगली

डॉ. संजय निंबाळकर
ठाणे

श्री. सचिन पोरे
नाशिक

श्रीमती ज्योती लष्करी
नाशिक

डॉ. विजया पाटील
नाशिक

डॉ. एस. एस. सोनुने
नाशिक

डॉ. डी. डी. पवार
नाशिक

डॉ. कविता साळुंके
नाशिक

डॉ. संगीता बिहाड
अमरावती

डॉ. निलिमा मोरे
अकोला

डॉ. विजया दहिवेलकर
धुळे

डॉ. प्रतिमा देसाई
गारगोटी

संपादन समिती (आशय, भाषा व अनुदेशन)

डॉ. अनंत जोशी
माजी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. कविता साळुंके
प्र.संचालक, व संयोजक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. शांताराम बुटे
सेवानिवृत्त प्राचार्य
अकोला

निर्मिती

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© 2020, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

❑ **प्रथम प्रकाशन** : जुलै 2020 ❑ **प्रकाशन क्रमांक** : २२९३

❑ **अक्षरजुळणी** : ॲकोसिस, नाशिक - 10 ❑ **पुनर्मुद्रन** : डिसेंबर २०२०

❑ **मुद्रक** : मे. नीट प्रिंटस्, प्लॅट नं. डब्ल्यू-३६/सी-१, एम.आय.डी.सी., अहमदनगर - ४१४ १११.

❑ **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

B-17-18-76 (EDU 423)

कुलगुरूंचे मनोगत

विद्यार्थी मित्रहो, शिक्षक हा व्यासंगी व बहुश्रुत असला पाहिजे. आपल्या विद्यार्थ्यांचे अध्ययन सुकर करण्यासाठी तसेच अध्यापन मनोरंजक, प्रभावी आणि दर्जेदार होण्यासाठी शिक्षकाने त्याचे ज्ञान अद्ययावत आणि सखोल ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ, शिक्षकाने इतिहास केवळ घटनांची, सनावळ्यांची जंत्री माहीत ठेवण्यापेक्षा त्या घटनेमागील पार्श्वभूमी जाणून घेतली तर इतिहास अध्यापनात रुची निर्माण करता येते. जेवढे वाचन सखोल, विस्तृत तेवढे शिक्षकाला आपल्या अध्यापनासंदर्भात उदाहरणे, माहिती देणे सहज शक्य होते. त्याचबरोबर प्रत्येक अध्यापनात विषय कोणकोणत्या आशयातून आपण लिंगसमभाव रुजवू शकतो याचाही शिक्षकाने विचार करणे महत्त्वाचे ठरते. केवळ कायदे करून लिंगसमभाव रुजणार नाही तर त्यासाठी प्रत्येकात ती जाणीवजागृती करणे महत्त्वपूर्ण ठरते. हा समभाव रुजविण्यासाठी, रूढ करण्यासाठी समाजातील असंख्य आव्हानांना आपल्याला सामोरे जावे लागेल. उदाहरणार्थ, स्त्रियांचे शोषण, आरोग्य, स्त्रीभ्रूण हत्या, लैंगिक छळ, वाढता हिंसाचार, इत्यादी. या सर्व प्रश्नांसंदर्भात शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. कारण शिक्षकाला भावी पिढीचा रचेयता म्हटले जाते. लिंगसमभाव रुजवण्यात शाळा व समाजाची भूमिका जाणून घेऊन त्यानुसार कार्य करण्यास हा विषय आपणास नक्की उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

कुलगुरू

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्त्री-पुरुष समानता' या घटकाचा प्रमुख [illegible]
शासकीय पातळीवर प्रसारमाध्यमे, सेवाभावी संस्था, तज्ज्ञ, विचारवंत, सामाजिक संघटना स्त्री-पुरुष समानतेला चालना देतात, पण आजच्या संगणक युगातही स्त्री पुरुषांच्या बरोबरीने जगू शकत नाही. याला अपवाद वगळता शिक्षण, आर्थिक सक्षमता, आत्मविश्वास याच्याअभावी तिचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' यापलीकडे जात नाही. स्त्रियांमध्ये, मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करून, त्यांच्यातील क्षमतांचा विकास करून त्यांना आत्मनिर्भर बनविले पाहिजे. यासाठी समाजाची स्त्रीबद्दलची मानसिकता, दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. म्हणून 'लिंगसमभाव'बाबत जाणीवजागृती करणे काळाची गरज आहे.

२.२.३ लिंग समभाव आणि सामाजिकीकरणात समाज, शालेय अभ्यासक्रम आणि औपचारिक-अनौपचारिक संस्थांचा सहभाग

(क) लिंग समभाव (Gender Equality)

स्त्री आणि पुरुष यांच्यासंदर्भात समाजात अनेक रुढिबद्धता, परंपरा, समज आहेत. कारण समाज संस्कृतीनिर्मित आहेत. या रूढिबद्धतेमुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आकारते, जर समाज सजग असेल तर लिंगभाव समानतेला त्या समाजात प्राधान्य दिले जाते.

लिंगभाव समानतेमध्ये स्त्री आणि पुरुष यांना जीवनात समान संधी दिली पाहिजे. वंश, लिंग, जात, धर्म, प्रांत सर्व लोकांमध्ये समान अंगभूत मूल्ये असतात, म्हणून स्त्री आणि पुरुष दोघेही समाजासाठी सारखेच मौल्यवान आहेत, त्यांना समान हक्क व जबाबदाऱ्या असल्या पाहिजेत.

Gender Equality

Gender Equality is the measurable equal representation of women and men. Gender Equality does not imply that women and men are the same, but that they have equal value and should be accorded equal treatment.



'लिंगसमभाव' हे स्त्री-पुरुषांचे मोजता येण्यासारखे समान प्रतिनिधित्व आहे. लिंग समभाव हे स्त्री-पुरुष सारखे आहेत हे सूचित करीत नाही, परंतु त्यांना समान मूल्य आहे आणि त्यांना समान वागणूक दिली पाहिजे हे सूचित करते.

The United Nations regards Gender Equality as a human right.

संयुक्त राष्ट्रांमध्ये लिंग समभाव हा मानवी हक्क आहे.

लक्षात ठेवा

'लिंगभाव समानता' म्हणजे स्त्री-पुरुषांना कोणताही भेदभाव न करता समान वागणूक व समान संधी देणे. अर्थात त्यांच्या आवडीनिवडी, कामाचे स्वरूप, कुटुंब, छंद यानुसार त्यांच्यात फरक असू शकतो.

उपक्रम

तुमच्या निदर्शनास आलेली लिंग समभावाची उदाहरणे नोंदवा. वर्गात चर्चा करा.

कृती

लिंग समभाव - काळाची गरज असे तुम्हांस वाटते का? सकारण पुढील जागेत नोंदवा.

(ख) सामाजिकीकरण (Socialisation)

सामाजिकीकरण म्हणजे व्यक्तीला सामाजिक प्राणी बनविण्याची प्रक्रिया होय.

Socialisation - Socialisation is the process by which the individual adopt his social environment and becomes a recognised, co-operative and efficient member of it.

- Drever

सामाजिकीकरण – सामाजिक वातावरणाशी जमवून घेऊन समाजास सहकार्य करणारा सभासद म्हणून ओळखले जाण्याच्या व्यक्ती प्रक्रियेला सामाजिकीकरण' म्हणतात.

ज्ञान, कौशल्य, कल, स्वभाव आत्मसात करून समाजातील सक्षम घटक बनण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिकीकरण.

– ऑरविल जी. ब्रिम


ज्या प्रक्रियेद्वारे वर्तन, मूल्ये आणि इतरांच्या तिच्याबाबत असलेल्या अपेक्षा व्यक्ती शिकते आणि त्यामुळे समाजातील विशिष्ट भूमिका बजावू शकते, त्या प्रक्रियेला सामाजिकीकरण' म्हणतात.

– गुरकिन आणि गुरकिन

सामाजिकीकरण हे मानवी प्राण्याचे खास वैशिष्ट्य आहे. अन्य प्राण्यांमध्ये सामाजिकीकरणाची शक्यता नसते. कारण सामाजिकीकरणाची प्रक्रिया ही मानवाच्या विशिष्ट प्रकारच्या जैव प्रकृतीवर आधारलेली आहे. त्याच्या या जैववैशिष्ट्यांमुळेच त्याला सामाजिकीकरण शक्य होते व आवश्यकही ठरते. मनुष्याच्या ठिकाणी भूक, कामवासना इत्यादी निश्चित अशा प्रेरणा किंवा सहजप्रवृत्ती असतात व त्यामुळे तो कार्यप्रवृत्त होत असतो. या प्रवृत्ती किंवा प्रेरणा जन्मजात असल्या तरी त्यांचे समाधान कसे करावे यासंबंधीचे मार्गदर्शन व नियमन समाजच करीत असतो. मानवी प्राणी इतर प्राण्यांपेक्षा बालवयात अधिक परावलंबी असतो. त्यामुळे अन्य समाजघटकांचे साहाय्य त्याला घ्यावे लागते व त्यातूनच सामाजिकीकरणाला प्रारंभ होतो.

थोडक्यात, विशिष्ट वय, व्यवसाय, दर्जा, लिंग भूमिका यांच्या विकासाच्या अवस्थांबरोबर व्यक्ती शिकते स्वत:चा सामाजिक विकास करून घेते, त्याला सामाजिकीकरण असेच म्हणतात.

लक्षात ठेवा



विचार करा

व्यक्तीचे सामाजिकीकरण झाले नाही, तर पशू आणि मानव यात काही फरक राहणार नाही.

कृती

व्यक्तीचे सामाजिकीकरण झाले नाही तर काय होईल? तुमची मते नोंदवा.

(ग) 'लिंग समभाव'साठी समाज, शालेय अभ्यासक्रम, औपचारिक आणि अनौपचारिक संस्थांचा सहभाग

★ लिंग समभाव' : समाज-सहभाग

भारतात अनेक जातीधर्माच्या लोकांचे वास्तव्य आहे. भाषा, प्रांत, धर्म, जात, वंश, संस्कृती आणि भौगोलिक परिस्थिती याबाबतीत भारतात वैविध्यता आढळते. प्रत्येक समाजाची स्वतंत्र अशी संस्कृती असते. प्रत्येक समाजात लिंगभावाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. त्यामुळे लिंगभाव समानता निर्माण करण्यासाठी काही अडथळे निर्माण होतात. समानतेसंदर्भात रूढिप्रियता परंपरा, चालीरिती इत्यादी घटक समाजमनावर खोलवर रुजलेले आढळतात. यातून समाजाला बाहेर काढून लिंग समभाव प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

समाजामध्ये महिलांविरुद्ध वाढती हिंसा दिसून येते. बलात्कार, हुंडाबळी, हुंड्यासाठी छळ, पळवून नेणे, फसविणे, स्त्रीभ्रूण हत्या, लग्नाचे आमिष दाखवून फसविणे, नोकरी करणाऱ्या महिलांचे लैंगिक शोषण करणे इत्यादी अनेक घटना सतत घडत असतात.


दिल्लीतील 'निर्भया' घटना, कोपर्डीतील बलात्काराची घटना, पत्रकार गौरी लंकेशचा खून या सर्व घटना लिंग समभावाविरोधी घडल्याचे दिसते.

भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुषांना समान अधिकार दिले आहेत. पण व्यवहारामध्ये स्त्रियांना नेहमीच दुय्यम वागणूक दिली जाते. पुरुष श्रेष्ठ की स्त्री अशा विचारसरणीचा पगडा अजूनही भारतीय समाजमनावर आहे.

लिंग समभावासाठी समाज भूमिका

पारंपरिक समाज	*आधुनिक समाज*
❖ मुलींना औपचारिक शिक्षणापासून दूर ठेवले. त्यांनी केवळ जीवनोपयोगी शिक्षण घ्यावे अशी अपेक्षा.	❖ सर्व प्रकारच्या शिक्षण संधी दिल्या.
❖ आर्थिक परावलंबन.	❖ आर्थिक स्वावलंबन.
❖ मुलगा वंशाचा दिवा-समज रूढ होता.	❖ मुलगा-मुलगी समान हा समज रूढ होत आहे.
❖ पुरुषप्रधान कुटुंब.	❖ स्त्री-पुरुष समान हक्क व अधिकार देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

स्त्री उच्चशिक्षित झाली तरीही जाती, प्रथा, अंधश्रद्धा, हळदी-कुंकू, वटसावित्री व्रत करताना दिसते. फुले, शाहू, आंबेडकर, गाडगेबाबा यांनी दिलेला विज्ञानवादी दृष्टिकोन अद्यापही काही बहुजन, उच्चवर्गीय स्त्रियांनी स्वीकारलेला नाही. समाजपरंपरांचा पगडा त्यांच्यावर अधिक असलेला दिसून येतो. म्हणून जोपर्यंत त्या चिकित्सक वृत्तीने, विज्ञाननिष्ठ भूमिकेतून, बुद्धी प्रामाण्यवादी निकषांच्या आधारे स्वतंत्र होत नाहीत, तोपर्यंत समाज त्यांच्यावर अत्याचार करत राहील व लिंग समभाव ही विचारधारा समाजात खोलवर रुजणार नाही.



आकृती : लिंग समभावसाठी समाज सहभागसाठीचे उपाय व उपक्रम

उपक्रम

- ★ गावागावांत माता-पालक प्रबोधनपर विविध व्याख्याने आयोजित करणे.
- ★ महिलांना सामाजिक उपक्रमात संधी देणे.
- ★ स्त्रीच्या विशेष कार्याचा सामाजिक स्तरावर गौरव/सत्कार करणे.
- ★ स्थानिक राजकारणात सक्रिय सहभागाची संधी देणे.
- ★ महिला मेळावे व त्यातून महिलांच्या व्यावसायिक कौशल्याला संधी देणे. (कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन, पाककला प्रदर्शन)

कृती

- ★ समाजात 'लिंग समभाव' रुजविण्यासाठी तुम्ही कोणते उपक्रम राबवाल यादी करा.
- ★ त्यापैकी काही उपक्रम तुमच्या गावात राबवा.
- ★ त्यासाठी 'लिंग समभाव'संदर्भात PPT तयार करा.

(घ) लिंग समभाव : शालेय अभ्यासक्रम सहभाग

भारतात असलेली पुरुषप्रधान संस्कृती त्यामुळे स्त्रियांच्या सुप्त क्षमतांच्या विकासात निर्माण झालेला अडथळा लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आमूलाग्र बदल करण्यात आले. १९८६ च्या शैक्षणिक धोरणात स्त्री सबलीकरणावर भर दिला.

Education will be used as an agent of basic change in the status of women. In order to neutralize the accumulated distortions of the past, there will be a well-conceived edge in favour of women. The National Education System will pay a positive interventionist role in the empowerment of women.


यावरून भारत सरकारची दृष्टी लिंग समभाव निर्माण करण्याचे एक प्रमुख साधन म्हणून शिक्षणाकडे पाहताना दिसून येते. शिक्षण सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे साधन/माध्यम म्हणजे शालेय अभ्यासक्रम होय. राष्ट्रीय शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (NCERT) तयार केलेल्या अभ्यासक्रम आराखडा १९७८, १९८८, २००० आणि २००५ मध्ये विशेष प्रयत्न करताना शिक्षणातील लिंगभाव विषमतेवर लक्ष केंद्रित केले. राष्ट्रिय माध्यमिक शिक्षा अभियान (RMS-) अंतर्गत माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणावर भर दिला आहे. हा कार्यक्रम २००९ मध्ये सुरू झाला. शिक्षणाचा हा टप्पा प्राथमिक व उच्चशिक्षणाला जोडणारा दुवा आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले आहे.

The Central Advisory Board of Education (CABE) Committee on Universalisation of Secondary Education (2005) stated that high quality secondary education would be provided to all adolescent boys girls upto the age of 16 by 2015 and girls upto the age of 18 by 2020.

- CABE

सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व अभ्यासक्रमातून लिंग समभाव निर्माण करण्यासाठी २१ व्या शतकातील अभ्यासक्रम आराखड्यात खालील बाबी सुचविण्यात आल्या.

Book Code : EDU 424
Subject Code : EDU 424



ज्ञान आणि अध्यासक्रम

EDU 424

अधिष्ठान अध्यासक्रम

आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय
स्थापना - १९५६
गारगोटी, जि.कोल्हापूर

IC. Principal
Acharya Jawadekar College of Education,
Gargoti, Dist. Kolhapur.

श्री माना विद्यापीठ, गारगोटी

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव
चव्हाण
महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ

EDU - 424

ज्ञान आणि अभ्यासक्रम

लेखक : डॉ. कविता साळुंखे, प्रा. एम.एस.उभाळे, प्रा. गजानन सपकाळ, डॉ. प्रीती पाटील, डॉ. डी.डी. पवार, डॉ. सज्जन थूल, डॉ. सोनुने एस.एन, डॉ. डी.एस. सूर्यवंशी, डॉ. पी.बी. दराडे, डॉ. प्रतिभा देसाई, डॉ. कुंभारे गोपाळकृष्ण, डॉ. नवनाथ इंदलकर, डॉ. भदाणे एम.ए., श्रीमती कल्पना साळुंखे, प्रा. विजयकुमार पाईकराव, श्रीमती अनिता थोरात, श्रीमती ज्योती लष्करी, डॉ. उमाकांत देशमुख

घटक १ : ज्ञान आणि ज्ञाननिर्मिती ०१

घटक २ : ज्ञाननिर्मिती प्रक्रिया ३४

घटक ३ : अभ्यासक्रम ६३

घटक ४ : अभ्यासक्रम विकसन ९३

घटक ५ : अभ्यासक्रम अंमलबजावणी व पुनर्रचना ११३

घटक १ ज्ञान आणि ज्ञाननिर्मिती

अनुक्रमणिका

१.१ उद्दिष्टे
१.२ प्रास्ताविक
१.३ विषय-विवेचन
    १.३.१ ज्ञान संकल्पना व स्वरूप
    १.३.२ भारतीय विचारवंतांनुसार ज्ञानाची संकल्पना
    १.३.३ पाश्चिमात्त्य विचारवंतांनुसार ज्ञानाची संकल्पना
    १.३.४ ज्ञान निर्मितीचे स्त्रोत व वर्गीकरण
    १.३.५ ज्ञाननिर्मिती प्रक्रिया ब्रुनर, पियाजे, व्हायगोत्स्की
१.४ सारांश
१.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.६ क्षेत्रीय कार्य
१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही-

* ज्ञानाची संकल्पना व तीचे स्वरूप स्पष्ट करू शकाल.
* महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर आणि अरविंद घोष यांच्या मतानुसार ज्ञानाचा संकल्पना सांगू शकाल.
* पाश्चिमात्त्य विचारवंतांनुसार (प्लेटो, फ्रेअरी व जॉन ड्युई) ज्ञानाची संकल्पना स्पष्ट करू शकाल.
* ज्ञाननिर्मितीचे स्त्रोत सांगू शकाल
* ब्रुनर, पियाजे व व्हायगोत्स्की यांनी सांगितलेली ज्ञाननिर्मिती प्रक्रिया स्पष्ट करू शकाल.

१.२ प्रास्ताविक

ज्ञान आणि शिक्षण हे दोन शब्द बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरले जातात. प्राचीन भारतीय वाङ्मयात शिक्षण ह्या शब्दाचा अधिक प्रमाणात वापर न करता, त्याऐवजी समानार्थी शब्द म्हणून ज्ञान व विद्या या संज्ञांचा वापर अधिक झालेला आपणास दिसतो. कारण आजच्या आधुनिक काळातील शिक्षणप्रमाणे केवळ लेखन, वाचन किंवा उपजीविकेचे साधन प्राप्त करण्यापुरतीच ज्ञानाची संकल्पना प्राचीन काळात मर्यादित नव्हती. ज्ञानदान व ज्ञानकार्य हा यज्ञ मानला जाई. भारतीय

ज्ञानशास्त्र हे ज्ञानाच्या संकल्पनेच्या बाबतीत अत्यंत समृद्ध होते. त्या काळी ज्ञान ही एक व्यापक संकल्पना होती. व्यक्तिगत हितासाठी ज्ञानाची मांडणी कधीही झाली नाही. मनुष्याचे सर्वांगीण जीवन समृद्ध करणे व समाजाला शहाणे करून जीवन समृद्ध बनविणे हाच ज्ञान निर्मिताचा मुख्य हेतू होता. अपरा-परा विद्या यातील (चांगले व वाईट ज्ञान) भेद स्पष्ट होता.

तत्त्वज्ञानाच्या तत्त्वमीमांसा, मूल्यमीमांसा व ज्ञानमीमांसा ह्या तीन शाखा आहेत. ज्ञानमीमांसा ह्या शाखेत ज्ञानाचा अभ्यास केला जातो. इंग्लिशमधील एपिस्टेमॉलॉजी (Epistemology) या संज्ञेचे भाषांतर म्हणून ज्ञानशास्त्र ही संज्ञा उपयोगात आणली जाते. एपिस्टेमॉलॉजी ही संज्ञा जेम्स फेरिएर (१८०८-१८६४) या स्कॉटिश तत्त्ववेत्त्याने प्रथम सुव्यवस्थितपणे प्रचारात आणली. ग्रीक भाषेत Episteme म्हणजे ज्ञान आणि logos म्हणजे शास्त्र. म्हणून Epistemology चा अर्थ ज्ञानशास्त्र. खरे व विश्वसनीय ज्ञान कोणते? ज्ञानाचे स्त्रोत व प्रकार कोणते? श्रेष्ठ व कनिष्ठ ज्ञान कोणते? ज्ञान प्राप्तीची साधने व पद्धती कोणत्या? तसेच ज्ञानाच्या मर्यादा कोणत्या? ज्ञान कसे विकसित होते? या सर्व प्रश्नांचा विचार ज्ञानमीमांसेत केला जातो. या घटकात आपण याच सर्व प्रश्नांसंदर्भात माहिती पाहणार आहोत.

१.३ विषय-विवेचन

१.३.१ ज्ञानाची संकल्पना व स्वरूप

क) अर्थ व स्वरूप :

भारतीय अध्यात्मवादानुसार ज्ञान म्हणजे 'अध्यात्मज्ञान', आत्मविद्या किंवा ब्रम्हज्ञान अशी मांडणी विविध धर्म ग्रंथात केलेली आपणास दिसून येते.

गीतेत ज्ञानाचे स्पष्टीकरण करताना भगवान श्रीकृष्णाने म्हटले आहे की,

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम।

एनज्ज्ञानमिती प्रोक्तमज्ञांन यदतो न्यंथा ।

(अध्यात्मज्ञान हेच नित्य आहे, अशी जी बुद्धी, तत्त्वज्ञानाचा अर्थ येथे ब्रह्म, त्याचे जे दर्शन, त्या सर्वांना ज्ञान असे म्हणतात. याखेरीज सर्व अज्ञान होय.)

भौतिकवादी किंवा विज्ञानवादीच्या मतानुसार 'भौतिक व विज्ञानवादी हेच खरे ज्ञान आहे.' भौतिक किंवा वैज्ञानिक ज्ञान म्हणजे, 'भौतिक गरजांची पूर्तता करण्यासाठी उपयुक्त ठरणारे ज्ञान होय.' कार्यवादी विचारसरणीप्रमाणे, 'ज्ञान म्हणजे क्रिया कौशल्ये, अनुभव यांच्याद्वारे मिळणारे ज्ञान आणि समस्या कृती, विचार व अनुभव हेच ज्ञानप्राप्तीचे मार्ग आहेत.' कार्यवादी विचार सरणीचा पुरस्कर्ता जॉन ड्युईच्या मते - 'जे ज्ञान कृती व प्रत्यक्षनुभव यातून प्राप्त होईल तेच खरे ज्ञान होय.'

तार्किक प्रत्यक्षवादानुसार - 'अनुभवजन्य, प्रयोगजन्य, तर्कान्त किंवा बुद्धीला पटेल तेच ज्ञान खरे आहे.' ''ज्ञान म्हणजे वास्तव घटनांचा अभ्यास व त्यानंतर त्यांचे स्मरण'' असे डॉ. ब्लूम म्हणतात.

जोशी, बी.आर. यांच्या सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धान्त कोशातील शिक्षणशास्त्रानुसार ''माहिती व घटना आणि आणखी काही गोष्टी ज्ञानात अंतर्भूत आहेत. ज्ञान मिळविण्यासाठी अनुभव व अभ्यास यांची आवश्यकता असते. अनुभव, श्रवण, वाचन यातून माहिती मिळते. परंतु केवळ माहिती म्हणजे ज्ञान नाही. माहितीकडून संबोध, संकल्पना, तत्त्वे, नियम, उपपत्ती इत्यादींकडे क्रमाणे जाणे ज्ञानासाठी आवश्यक असते. ज्ञानात मूर्ताकडून व अमूर्ताकडून मिळालेले ज्ञान असे दोन प्रकारही दिसतात. ''

विद्यार्थ्यांच्या जीवनविषयक दृष्टीकोनावर काही संस्कार उमटवेल तसेच त्यांच्या आचारविचारात, व्यवहारात परिवर्तन घडवून आणेल तेच खरे जे ज्ञान''असेही म्हणता होते.

ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो याने ज्ञान म्हणजे काय? हा प्रश्न प्रथम उपस्थित केला. प्लेटोच्या मते ''एखाद्या निवेदनाचा ज्ञान म्हणून स्वीकार करण्यासाठी त्यात तीन निकषांची पूर्तता हवी, ते म्हणजे, ज्ञानाच्या रूपात ते मान्य असेल. त्याची सत्यता

आणि विश्वासपात्रता असेल.''

जॉन कुक विरसन यांच्या मतानुसार ''ज्ञानाची संकल्पना मूलभूत असून तिची व्याख्या करता येत नाही.''

थोडक्यात ज्ञान हे मानवी चिकित्सा व जिज्ञासा यातून निर्माण होत असते. मनुष्य त्याच्या आयुष्यामध्ये सत्याचा शोध घेतो, त्यातून ज्ञानाची निर्मिती होते. सत्याचा हा शोध विज्ञान व तत्त्वज्ञान ह्या दोहोंतून होतो असे म्हणतात. कारण विश्वाची निर्मिती कशी झाली? विश्वाचा शेवट कसा होणार? विश्वाची रचना कशी आहे? सजीव निर्मितीचे प्रयोजन काय? जीवनाचा नेमका अर्थ काय? असे कितीतरी प्रश्न विज्ञान व तत्त्वज्ञानात समाविष्ट आहेत.

तत्त्वज्ञान, तर्क आणि कल्पनाशक्ती यांचा विचार करून अमूर्त विचारांच्या चढत्या क्रमाने अंतिम सत्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न करते. तर विज्ञान प्रयोग, निरीक्षण, मापन आणि पडताळा यांचा वापर करून टप्प्याटप्प्याने सत्याकडे वाटचाल करते. परिणामी तत्त्वज्ञानातील ज्ञानापेक्षा विज्ञानातील ज्ञानाला समजावून घेणे सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने अधिक सोपे असते. विश्व हे ज्ञानाचे भांडार आहे. या विश्वातील निसर्गातील घटना ज्या नियमानुसार घडतात, त्या नियमांचे शोधन करणे याला मूलभूत ज्ञान असे आपण म्हणतो. तर त्या मूलभूत ज्ञानाचा मानवी जीवनासाठी वापर करणे याला उपयोजित ज्ञान असे आपण म्हणतो. त्या मूलभूत ज्ञानाचा मानवी जीवनासाठी वापर करणे याला उपयोजित ज्ञान असे म्हणतो. ज्ञान हे निरपेक्ष व तटस्थ वृत्तीचे असते. ज्ञानाच्या वाढीला व विकासाला सतत वाव आहे. हे विश्व म्हणजे ज्ञानाचे भांडार आहे. त्यामुळेच नवीन-नवीन शोध लागताना दिसतात. ज्ञान, स्थळ, काळ, परिस्थिती, आणि व्यक्तिनिरपेक्ष तसेच सर्व व्यापक असते. ज्ञानाची जसजशी वाढ होते, तसतशा ज्ञानाच्या विविध शाखा निर्माण होतात. त्यांना आपण विविध विद्याशाखांच्या नावाने ओळखतो. परंतु विश्वातील एकूण ज्ञानाचे स्वरूप मात्र एकात्म व नित्य प्रवाही असते. त्यामुळेच ज्ञानाचे संदर्भ आणि संबंध सतत बदलत असतात. येथे ज्ञानाचा अर्थ केवळ शब्दज्ञान किंवा पुस्तकी पांडित्य अभिप्रेत नाही. हे वरील विवेचनावरून आपल्या लक्षात आले असेलच. आज आपण व्यापक अर्थाने शिक्षणालाच ज्ञान म्हणतो ते ही बरोबर नाही कारण केवळ लेखन, वाचन, संभाषण, माहिती इतक्या पुरतेच ज्ञानाची संकल्पना मर्यादित नाही. शिवाय चार भिंती व ठरावीक वर्गाचे कालखंड यात ज्ञानाला बंदिस्तही करता येत नाही. ज्ञानाची संकल्पना अतिशय व्यापक व विशाल आहे. ज्ञान हे एकत्त्वाने आपल्यापुढे येते.

ख) ज्ञानाचे महत्त्व

बेकन यांनी 'Knowledge is power of Education' ज्ञानाच्या शक्तीला दुजोरा देऊन ज्ञानाचे महत्त्व विशद केले आहे. तर भारतीय अध्यात्मवादात 'ज्ञान मनुजस्य तृतीय नेत्रम्' या वचनानुसार ज्ञानाला तृतीय नेत्र म्हणून मानवी जीवनात महत्त्वाचे स्थान दिले आहे. तसेच पुढे भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, 'नही ज्ञानेन् सदृश पवित्रमिह विद्यते' म्हणजेच ज्ञानाइतकी पवित्र विद्या या जगात दुसरी कोणतीही नाही. आज आपण पाहतोच की, अज्ञानी माणसाला अनंत संकटांना सामोरे जावे लागते. ज्ञानाधिष्ठित समाजाची निर्मिती करण्यासाठी आजच्या शिक्षण प्रक्रियेत 'Knowledge is aim of Education' ध्येय म्हणून ज्ञानाला स्थान दिले आहे. येथे उद्दिष्ट ह्या अर्थाने नव्हे. कैवल्ये (ज्ञानादेव तू कैवल्यम:) प्राप्तीचे साधन म्हणून ज्ञानाचा गौरव केला जातो. येथे केवळ शब्दज्ञान नाही तर अनुभवाधिष्ठित ज्ञान, स्वानुभूत ज्ञान अपेक्षित आहे. सॉक्रेटिसने तर ज्ञान म्हणजे सद्गुण असे म्हटले आहे.

ग) ज्ञानाची कार्य

उपरोक्त विवेचनातील अर्थ, स्वरूप व महत्त्व समजावून घेतल्यास त्यावरून ज्ञानाची खालील कार्य सांगता येतील.

विविध संकल्पनांचा आशय स्पष्ट करणे, त्यांचा परस्परसंबंध निश्चित करणे- ज्ञानाचे वर्णन आणि मूल्यमापन करताना ज्ञान, भ्रम, प्रत्यक्ष ज्ञान, अनुमान, प्रचिती, विधान, सत्य इत्यादी संकल्पनांचे विश्लेषण, ज्ञान प्रामाण्याचे निकष निश्चित, विविध विषयाच्या ज्ञानाची एक सुसंगत व्यवस्था, मानवाला सामाजिक तसेच वैक्तिगत जीवनासाठी मार्गदर्शन, या सृष्टीतील विविध अनाकलनीय घटनांचा वा गोष्टींचा उलगडा करण्यासाठी साह्य करणे आणि नवीन ज्ञानाची निर्मिती करणे होय.

मावनी समाजामध्ये शिक्षणाची सुरुवात ज्ञानग्रहण व ज्ञानदान या हेतूने झाली. मात्र 'ज्ञान' या संकल्पनेचा विविध अंगांनी अर्थ लावलेला आहे. एखाद्या अमूर्त विषयावर विविध मार्गांनी माहिती गोळा करणे, त्या माहितीच्या आधारे चिंतन

करणे, त्या विषयाशी संबंधित अनुभव घेणे, स्वत:च्या जाणिवेतून तसेच नेणिवेतून त्यासंबंधी अर्थ प्राप्त करून घेणे, स्वअनुभूती घेणे, त्या विषयांच्या विचारांमधून अंत: प्रेरणेची निर्मिती करणे इ. बाबींचा ' ज्ञान' या संकल्पनेमध्ये समावेश होतो.

''सुसंघटित माहिती म्हणजे ज्ञान किंवा सुसंघटित माहिती प्राप्त केल्यावर होणारा समज किंवा येणारी जाणीव म्हणजे ज्ञान''- रॅंडम हाऊस डिक्शनरी ऑफ द इंग्लिश लॅंग्वेज. (सप्रे, पाटील २००९)

अध्यात्मवादानुसार ज्ञान म्हणजे, 'आत्मज्ञान, अध्यात्मज्ञान, किंवा ब्रम्हज्ञान.'

गेट्स यांच्या शब्दात, ' शिक्षण म्हणजे विकासशील बदल', मानसशास्त्रज्ञांच्या मते हा वर्तनबद्दल शारीरिक किंवा क्रियात्मक पातळी, भावात्मक पातळी आणि ज्ञानात्मक किंवा बौद्धिक पातळी या तीन पातळ्यात घडून येतो.

अशा या तिन्ही पातळीवर होत असलेल्या विकास प्रक्रियेतूनच माणसाच्या अंगी विविध प्रकारची शारीरिक व क्रियात्मक कौशल्ये निर्माण होतात. त्यांच्या भावनांचा परिपोष होऊन अभिरूची व अभिवृत्ती यांना वळण लागते, बौद्धिक व वैचारिक विकास होऊन तो ज्ञानप्राप्ती करून घेतो.

ज्ञान अमर्याद असते. ज्ञान प्रवाही असल्यामुळे त्यातून नवपरिकल्पना अस्तित्वात येतात. ज्ञान कृतिप्रवण आहे. आदान-प्रदानामुळे ज्ञान नष्ट न होता वृद्धिंगत होते. ज्ञान जसे उपकारक आहे तसे अपकारकही आहे. असे हे ज्ञान समाजाला अखंडपणे देण्याचे कार्य महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, अरविंद घोष अशा अनेक शिक्षणतपस्वींनी अखंडपणे केले.

१.३.२ भारतीय विचारवंतानुसार ज्ञानाची संकल्पना

क) महात्मा गांधींच्या विचारांनुसार ज्ञानाची संकल्पना

एखाद्या उद्योगामार्फत किंवा हस्त व्यवसायामार्फत मुलांना शिक्षण द्यावयाचे ही महात्माजींची अभिनव कल्पना. ती कल्पना कृतीद्वारा शिक्षण या संकल्पनेला धरूनच होती. कृती करताना मुलांची जिज्ञासा, कृतिशीलता, आत्मप्रवृत्ती ह्या सहजप्रवृत्तींचा उपयोग होत असल्यामुळे मुलांचे शिक्षण सहज प्रवृत्तींना धरून होते. तसेच कृतीत केवळ शरीराच्याच हालचाली न होता निरीक्षणशक्ती, कल्पनाशक्ती, विचारशक्ती या शक्तींचीही वाढ होते. म. गांधींनी म्हणून ' मूलोद्योगाला' शिक्षण प्रक्रियेत मध्यवर्ती स्थान दिले.

ज्ञान संकल्पना

या परिस्थितीत मूलोद्योगाचा संबंध मात्र जीवनाशी असावयास पाहिजे. मानवाच्या मूलभूत गरजा, अन्न, वस्त्र, निवारा यांच्याशी संबंधित म्हणजेच अन्नासाठी शेती व्यवसाय, वस्त्रासाठी सूतकताई, विणकाम, निवाऱ्यासाठी लाकूडकाम, लोहारकाम, मातकाम अशा रचनात्मक उद्योगांची निवड करावी असे गांधींचे मत होते. शेती, वस्त्रविद्या, रचनात्मक उद्योग यापैकी एक मूलोद्योग निवडल्यावर त्या मूलोद्योगाच्या विविध कृतीतून भाषा, अंकगणित, समाज-जीवनशास्त्र, सामान्यज्ञान या विषयांच्या ज्ञानाची गुंफण करणे गांधींना अपेक्षित होते. मूलोद्योगाद्वारे केवळ बौद्धिक ज्ञानच न देता मूलोद्योगाचा संबंध समाज जीवनाशी आणून मुलांना नागरिकशास्त्राचे धडे द्यावेत असे त्यांचे मत होते. तसेच मूलोद्योगाचा संबंध नैसर्गिक परिस्थितीशी आणून मुलांना निरीक्षण व अनुभव यांच्या साहाय्याने सामान्यज्ञानाची ओळख करून द्यावी. अशा प्रकारे मूलोद्योगाची शिक्षणक्षमता समवाय पद्धतीने साध्य करावी असे ते म्हणत. मूलोद्योग म्हणजे औद्योगिक शिक्षण नसून मुलांच्या सहजप्रवृत्तींचा योग्य विकास करून जीवनकलहात आपले जीवन यशस्वीरितीने जगण्यास त्यांना लायक बनविणे महात्मा गांधींना अपेक्षित होते.

विचार करा

मुलांची स्वयंप्रेरणा, मुलांचे स्वयंशिक्षण, मुलांच्या स्वत:च्या कुवतीप्रमाणे कार्यमग्नता व कार्यकुशलता ही बालकेंद्रित शिक्षण पद्धतीची वैशिष्ट्ये गांधींच्या मूलोद्योग शिक्षण पद्धतीत दिसून येतात.

हे करून पाहा.

तुम्ही तुमच्या विद्यार्थ्यांच्या कृतीला वाव देण्यासाठी विणकाम, भरतकाम, कापड किंवा मातीच्या भांड्यावर वारली पेंटिंग किंवा अन्य चित्रकला, ग्रिटिंग कार्ड (संक्रांत भेटकार्ड) निर्मिती व या सर्वांचे प्रदर्शन- विक्रीच्या माध्यमातून मूलोद्योगाची संकल्पना छोट्या स्वरूपात विद्यार्थ्यांमध्ये रूजवून पाहा.

उपक्रम

तुम्ही तुमच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या हस्तकौशल्याला वाव देणारे उपक्रम राबविता. समंत्रण सत्रात तुमच्या सहाध्यायीसोबत याबाबत चर्चा करा. उपक्रम कार्याच्या माहितीची देवाणघेवाण करा.

म. गांधींनी मूलोद्योग शिक्षण पद्धतीतही ज्ञान हे एकजिनसी किंवा सलग किंवा एकसंघ आहे असे मानले आहे.

महात्मा गांधींच्या मते, ' विविध ज्ञानशास्त्रांचा मध्यबिंदू मानव. त्याच्या विविध कृतीतून निरनिराळ्या प्रकारचे ज्ञान उदयाला आले व संवर्धित झाले असे मानावे. ज्ञानाचा, ' मानव' हा केंद्रबिंदू मानला तर मग ज्ञानाच्या कृत्रिम मर्यादा म्हणजेच शालेय स्तरावर असलेले विषय हे वेगळे किंवा विभक्त वाटणार नाहीत.

गांधीजी म्हणतात, '' माणसाच्या शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक अंगांमधील उत्कृष्टतेचा विकास व अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण.''

ते म्हणतात, '' साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षणाचा प्रारंभदेखील नव्हे. आत्मा व मन यांचा परिपूर्ण विकास करून व्यक्तींमधील सर्वोत्कृष्ट गुणांची अभिव्यक्ती करणे हे शिक्षणाचे खरे ध्येय.'' शिक्षणात महात्मा गांधींनी व्यक्तिमत्त्वाच्या सर्व घटकांचा अंतर्भाव केला आहे. 3H- HEAD, HEART AND HAND ही कल्पना मांडून या सर्व अंगांच्या विकासावर भर देणारे ज्ञान द्यावे व ज्ञाननिर्मिती कौशल्य आत्मसात व्हावीत तसे वर्ग वातावरण असावे असे त्यांनी सुचविले आहे.

लक्षात ठेवा

सत्याचे ज्ञान झाले म्हणजेच आत्मसाक्षात्कार होऊ शकेल. सत्यालाच गांधीजी ईश्वर मानीत व सत्यज्ञान हेच ईश्वरज्ञान, अज्ञानाचे पटल दूर झाले की, सत्याचा प्रकाश दिसतो असे ते म्हणत.

महात्मा गांधींच्या मते, ज्ञान मिळविण्याची पद्धती म्हणजे ' अनुभवांती शिक्षण' होय. प्रत्यक्ष जीवन प्रसंगातून ज्ञानसाधना करावी. मूलोद्योगातून ज्ञानकण व कौशल्य संपादन करावे. निसर्गपरिचयातून निरीक्षणशक्ती, विचारशक्ती यांचा विकास करावा अशा प्रकारे मूलोद्योग, निसर्ग, समाज यांच्या माध्यमातून अनुभवक्षेत्र वाढवून मुलांना ज्ञानलाभ करून द्यावा. अशा अनेक स्त्रोतांतून ज्ञाननिर्मिती व ज्ञानप्राप्ती व्हावी असे त्यांचे मत होते. ज्ञान मिळविण्यासाठी अभ्यासक्रमात हस्तव्यवसाय : उदा. हातमाग व हातसूत, सुतारकाम, शेती, फळे व भाजीपाला, उत्पादन, चामड्याचे काम, स्थानिक उत्पादनक्षम व्यवसाय याचा विचार करावा.

उपक्रम

ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध येईल असे कोणते उपक्रम तुम्ही तुमच्या शाळेत राबवाल. यादी करा. त्यापैकी काही उपक्रम तुमच्या शाळेत राबवा.

विचार करा

तुमच्या शाळेला 'जीवन-शिक्षण शाळा' हे नाव सार्थ ठरावे यासाठी कृती आराखडा तयार करा व त्याची अंमलबजावणी करा.

विषय

